महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५६ /२०२५ दि. ०६/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील **कळवा, ठाणेनगर व राबोडी** वाहतुक उप विभाग हद्दीमध्ये दिनांक ०८/०८/२०२५ रोजी **'नारळी पोर्णिमा'** सणानिमित्ताने ठाणे शहरात कळवा खाडीवरील पुल, सिडको रोड, क्रिक नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा नाका, पोलीस मुख्यालय, ठाणे परीसरात भरणाऱ्या यात्रेच्या दिवशी मोठया स्वरुपात जनसमुदाय यात्रेत सहभागी होत असतो. त्यामुळे सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** क्रिक नाक्या कडुन उर्जिता हॉटेल मार्गे पोलीस कवायत मैदाना समोरील रोडने कोर्ट नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अर्जिता हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने क्रिक नाका, उर्जिता हॉटेल येथुन आर.टी.ओ. कार्यालय, जी.पी.ओ. येथुन पुढे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** साकेत रोडने सिडकोकडे जाणाऱ्या टी.एम.टी. व एन.एम.एम.टी. च्या बसेस ( काल्हेर, पुर्णा व पंचगंगा ) यांना क्रिक नाक्या कडे जाताना **राबोडी वाहतूक उप विभाग समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | साकेत रोडने सिडकोकडे जाणाऱ्या टी.एम.टी. व एन.एम.एम.टी. च्या बसेस क्रिक नाक्याकडे न जाता राबोडी वाहतूक उप विभागा समोरुन यु टर्न घेवुन पुन्हा साकेत मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** ठाणे शहरातून कळवा पुल मार्गे नवी मुंबईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या लक्झरी बसेस, एस.टी.बसेस व खाजगी कंपनी बसेस यांना **कॅडबरी सिग्नल, गोल्डन डाईज नाका व खोपट सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | **अ)** सदरच्या सर्व प्रकारच्या लक्झरी बसेस, एस.टी.बसेस व खाजगी कंपनी बसेस हया द्रुतगती मार्गे (हायवे रोडने) कॅडबरी सिग्नल, कोपरी ब्रिज – मुलुंड टोल नाका – ऐरोली ब्रिज मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>**ब)** सदरच्या सर्व प्रकारच्या लक्झरी बसेस, एस.टी.बसेस व खाजगी कंपनी बसेस हया द्रुतगती मार्गे (हायवे रोडने) गोल्डन डाईज नाका – खारेगांव टोल नाका – पारसिक नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** गोल्डन डाईज नाक्याकडुन जी.पी.ओ. मार्गे क्रिक नाक्याकडे येणाऱ्या चारचाकी, जड अवजड व मालवाहु वाहनांना **गोल्डन डाईज नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | **अ)** सदरची वाहने ही साकेत ब्रिज – खारेगाव टोल नाका – पारसिक सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>**ब)** सदरची वाहने ही कॅडबरी जंक्शन – कोपरी ब्रिज – मुलुंड टोल नाका – ऐरोली ब्रिज मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **५)** नवीमुंबई कडुन विटावा मार्गे कळव्याकडे येणाऱ्या जड अवजड, सहाचाकी वाहने, सर्व प्रकारची मालवाहू वाहने, नवी मुंबई परिवहन सेवेच्या व खाजगी बसेस यांना **कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत ग्रीन वर्ल्ड, पटणी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने ग्रीनवर्ल्ड पटणी येथुन डाव्या बाजुला वळण घेवुन ऐरोली खाडी ब्रिजचा वापर करुन पुढे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **६)** मुंब्रा बाजुकडुन पारसिकनगर मार्गे कळवा खाडी ब्रिजकडे येणाऱ्या जड अवजड, सहाचाकी वाहने, सर्व प्रकारची मालवाहू वाहने, ठाणे महानगर पालीकेच्या बसेस व खाजगी बसेस यांना **कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत पारसिक सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने ही पारसिक सर्कल – गॅमन जंक्शन – खारेगाव टोलनाका मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील. |

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **७)** सिडको कडुन दादोजी कोंडदेव स्टेडीयम मार्गे क्रिक नाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ठाणेनगर वाहतूक उप विभागाच्या हद्दीत पारेख ट्रान्सपोर्ट** येथे **प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | **अ)** कळव्याकडे जाणारी वाहने ही फ्लॉय ओव्हर ब्रिज वरुन कळवा नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>**ब)** साकेतकडे जाणारी वाहने ही ठाणे पोलीस स्कुल येथुन सरळ कोर्टनाका मार्गे इच्छीत स्थळी जातील. |

**सदर वाहतूक अधिसूचना दि. ०८/०८/२०२५ रोजी सकाळी १२:०० वा. पासुन ते रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.